THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 24TH JANUARY 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालील आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख २७ माहे डिसेंबर सन १८९४ रोजीं मंजूर केला, तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे :—

### सन १८९४ चा आक्ट १७ वा.

सन १८९४ चा कापसाच्या मालावरील जकातीबाबद्चा आक्ट.

अनुक्रमाणिका.

प्रथमारंभींचे ठराव.

कलमें.

१. सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

२. व्याख्या.

३. ताब्यांतील अमलदारांनीं कस्टम्सचे अमलदारांचीं कामें करण्याबाबद.

भाग १.

एक्सैझ.

जलमार्गांचा कस्टम्सचा आक्ट लागू करण्याबाबद.

४. ह्या भागास जलमार्गांचा कस्टम्सचा आक्ट लागू करतेवेळीं त्या आक्टांत करावयाचे फेरफार.

जकात.

कलमें.

५. ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या गिरण्यांमध्यें तयार केलेल्या सुतावर जकात बसविण्याबाबद.

६. अशा सुताची तारिफ-किंमत ठरविण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस अधिकार.

७. गिरणीच्या मालकांनीं तयार केलेल्या सुताचें माही पत्रक देण्याबाबद.

८. जकात आकारण्याबाबद आणि ती भरण्याच्या नोटिशीबाबद.

९. जलमार्गांचा कस्टम्सचा आक्ट ह्याचीं विवक्षित कलमें ह्या आक्टाअन्वयें जकात आकारण्या-

कलमें.

च्या व वसूल करण्याच्या कामीं लागू करण्याबाबद.

१० न भरलेली जकात वसूल करण्याबाबद.

**वखारींत माल भरून ठेवणें.**

११ सूत भरून ठेवण्यासाठीं वखारींस लैसेन्स देण्याबाबद आणि त्यांबद्दल फी घेण्याबाबद.

१२. सूत वखारींत भरून ठेवण्याची परवानगी.

१३. ह्या रीतीनें भरून ठेविलेल्या सुतास, जलमार्गाचा कस्टम्सचा आक्ट ह्याच्या ११ व्या बाबींतले ठराव लागू करण्याबाबद.

१४. ह्या रीतीनें भरून ठेविलेल्या सुतावर जकात न आकारण्याबाबद.

**तपासणी.**

१५. गिरण्या तपासण्यास व कागदपत्रांच्या व हिशेबाच्या नकला घेण्यास कलेक्टरास अधिकार.

१६. मिळविलेली माहिती सन १८८९ चा १९ वा आक्ट ह्याच्या अर्थाअन्वयें सरकारी गुप्त गोष्ट समजावी.

**बाहेर पाठविणें व ड्राव्याक.**

१७. जकातीस पात्र असलेलें सूत पारक्या बंदरास पाठविणें असेल तेव्हां सर्टिफिकेट देण्याबाबद.

१८. सर्टिफिकेट दिलें ह्मणजे, सुतावर जकात माफ होईल.

१९. पारक्या बंदरांस पाठविलेल्या सुताबद्दल दिलेली जकात परत देण्याबाबद.

२० पारक्या बंदरांस पाठविलेल्या विवक्षित कापसाच्या कापडाबद्दल दिलेली जकात परत देण्याबाबद.

२१. अशी जकात केव्हां परत द्यावी त्याबाबद.

२२. विवक्षित बंदरांस पाठविलेल्या मालाच्याबाबतींत ड्यूटी परत देण्याची मनाई करण्याचा अधिकार.

२३. विवक्षित बाबतींत जकात परत न देण्याबाबद.

२४. जलमार्गाचा कस्टम्सच्या आक्ट ह्याचीं कलमें ९१ व ९२ हीं ह्या आक्टाखालील दाव्यांस लागू करण्याबाबद.

कलमें.

**अपराध व शिक्षा.**

२५. अपराधांबद्दल शिक्षा.

२६. कोणत्या माजिस्ट्रेटांस हुकमत आहे तें.

२७. जलमार्गाचा कस्टम्सचा आक्ट ह्याचें कलम १६८ वें ह्या आक्टाअन्वयें जप्त करून सरकारदाखल केल्याच्या प्रकरणांस लागू करणें.

२८. त्याच आक्टाचे विवक्षित ठराव ह्या आक्टाअन्वयें चालविलेल्या कामास लागू करणें.

२९. ह्या आक्टाखालील हुकूम रद्द करण्यास किंवा त्यांत फेरफार करण्यास स्थानिक सरकारास अधिकार.

**किरकोळ.**

३०. नमुने घेण्याचा अधिकार.

३१. गिरण्यांच्या मालकांनीं कागदपत्र व हिशेब ठेविले पाहिजेत.

३२. जलमार्गाचा कस्टम्सचा आक्ट ह्याच्या १९८ व्या कलमांतील ठराव ह्या आक्टाअन्वयें चालू केलेल्या कामास लागू करणें.

३३. कानू करण्याचा अधिकार.

३४. जलमार्गाच्या कस्टम्सच्या आक्टांतील विवक्षित ठराव ह्या भागांत दाखल करण्याबाबद.

३५. तारिफाबाबद आक्टाचें १० वें कलम ह्या आक्टाखालील जकातीस लागू करण्याबाबद.

---

# भाग २.

**देशांतील कस्टम्सची जकात.**

३६. पारक्या मुलुकांतून ब्रिटिश हिंदुस्थानांत येणारें सूत व कापसाचें बनावलेले जिन्नस यांवर जकात घेण्याबाबद.

३७. जलमार्गाच्या कस्टम्सच्या आक्टाचे ड्राव्याक संबंधाचे ठराव ह्या भागाअन्वयें कर आकारलेल्या मालास लागू करण्याबाबद.

**परिशिष्ट—सुताची तारिफ-किंमत.**

## कापसाच्या मालावर विवक्षित जकात बसवून ती वसूल करण्याचा ठराव करण्याकरितां आक्ट.

कापसाच्या मालावर विवक्षित जकात बसविणें ज्या अर्थी इष्ट आहे, त्या अर्थी, यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहेः—

### प्रथमारंभींचे ठराव.

१. (१) ह्या आक्टास सन १८९४ चा कापसाच्या मालावरील जकातीबाबदचा आक्ट असें म्हणावें; सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो एकदम अमलांत येईल.

२. ह्या आक्टांत, विषय किंवा पूर्वापर संबंध ह्यांस बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(१) "मुख्य आक्ट" ह्या संज्ञेचा अर्थ, "सन १८७८चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट" असा समजावा;

(२) "कस्टम्सचा मुख्य अधिकारी" ह्या संज्ञेचा अर्थ, मद्रास इलाख्यांत आणि बंगालचे लेफ्टेनंट गव्हर्नर, वायव्य प्रांतांचे लेफ्टेनंट गव्हर्नर व अयोध्येचे चीफ कमिशनर ह्यांच्या प्रत्येकाच्या अमलांतील मुलुखांत, बोर्ड आफ् रेव्हिन्यू, सिंध शिवाय करून बाकीच्या मुंबई इलाख्यांत, कस्टम्सचा कमिशनर, सिंधमध्यें, सिंधचा कमिशनर, पंजाबांत व ब्रह्मदेशांत, फिनान्शिअल कमिशनर, आणि इतर मुलुखांत, स्थानिक सरकार किंवा ज्या अमलदारास तें स्थानिक सरकार सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन ह्या बाबतींत त्याच्या नांवानें किंवा हुद्याच्या संबंधानें नेमील, तो अमलदार, असा समजावा;

(३) "कलेक्टर" ह्या शब्दाचा अर्थ,

(अ) कलकत्ता, मुंबई, मद्रास, रंगून व कराची ह्या शहरांत, कस्टम्सचा कलेक्टर असा समजावा;

(ब) इतर कोणत्याही जागीं, त्या जिल्ह्याचा कलेक्टर किंवा डेप्युटी कमिशनर, अगर स्थानिक सरकार ह्या बाबतींत ज्या इतर अमलदारास नेमील तो अमलदार, असा समजावा, आणि ह्या शब्दांत,

(क) ह्या आक्टाखालचीं कलेक्टराचीं सर्व किंवा कोणतींही कामें करण्यासाठीं स्थानिक सरकारानें त्या त्या वेळासाठीं योग्य रीतीनें अधिकार दिलेल्या प्रत्येक अमलदाराचा समावेश होतो असें समजावें.

(४) "गिरणी" ह्या शब्दाचा अर्थ, ज्या कोणत्याही इमारतींत किंवा जागेंत, हस्तश्रमाशिवाय इतर कोणत्याही प्रकारें चालविलेल्या यंत्रांनीं कापसाचे तंतूचें कांतून किंवा इतर रीतीनें सूत करण्यांत येतें, अगर सूत विणण्यांत येतें, किंवा त्याचे इतर जिन्नस बनविण्यांत येतात ती इमारत किंवा जागा, असा समजावा;

(५) "वखार" ह्या शब्दाचा अर्थ, माल सांठवून ठेवण्यासाठीं ह्या आक्टाअन्वयें लैसेन्स दिलेली जागा, असा समजावा; आणि या शब्दांत, मुख्य आक्टाच्या १५ व्या किंवा १६ व्या कलमाअन्वयें अगर सन १८८७ चा खुषकीवरील बांडेड वखारींबाबद आक्ट ह्याच्या २ऱ्या कलमाअन्वयें योग्य रीतीनें नेमिलेल्या प्रत्येक सरकारी वखारीचा किंवा योग्य रीतीनें लैसेन्स दिलेल्या प्रत्येक खासगी वखारीचा समावेश होतो;

(६) "सूत" ह्या शब्दाचा अर्थ, सर्वांशीं किंवा अंशतः कापसाच्या तंतूंनीं बनलेलें सूत, असा समजावा; आणि

(७) "कस्टम्सचें बंदर", "पारकें बंदर", "तारू" व "मास्तर" ह्या प्रत्येक शब्दाचे मुख्य आक्टांत जे अर्थ ठरविले आहेत, तेच अर्थ त्या त्या शब्दास ह्या आक्टांत आहेत, असें समजावें.

ताब्यांतील अमलदारांनीं कस्टम्सचे अमलदारांचीं कामें करण्याबाबद.

३. कलेक्टराच्या ताब्यांतील अमलदारांनीं, ह्या आक्टाच्या कारणांसाठीं, स्थानिक सरकार सदहू प्रमाणें इतर रीतीनें फर्मावील ते प्रसंग शिवायकरून अन्य प्रसंगीं, मुख्य आक्टाअन्वयें कस्टम्सच्या अमलदारांकडे सोंपविलेलीं कामें केलीं पाहिजेत व त्यांस दिलेले अधिकार चालविले पाहिजेत.

---

## भाग १.

### एक्सैझ.

### जलमार्गाचा कस्टम्सचा आक्ट लागू करण्याबाबद.

ह्या भागास जलमार्गाचा कस्टम्सचा आक्ट लागू करतेवेळीं त्या आक्टांत करावयाचे फेरफार.

४. मुख्य आक्ट अगर त्याचें कोणतेंही विवक्षित कलम अगर कलमें ह्या भागास लागू करतेवेळीं, त्यांत खालील फेरफार केले पाहिजेत, ते येणेंप्रमाणें:—

(अ) "मालाचा मालक" ह्या संज्ञेंत, कोणत्याही गिरणीच्या म्यानेजिंग एजंटाचा अगर इतर मुख्य अमलदाराचा समावेश होतो, असें समजावें;

(ब) "एन्ट्रीचें बिल" अगर "शिपिंग बिल" ह्या शब्दांच्या ऐवजीं "ह्या आक्टाप्रमाणें द्यावयाचें पत्रक" हे शब्द दाखल करावे;

(क) वखार अथवा वखारींत माल भरून ठेवणें ह्यासंबंधानें जें कांहीं सांगण्यांत आलें आहे, तें सर्व, ह्यांत वर व्याख्या केलेल्या प्रकारच्या "वखारी" ह्या संबंधानें सांगितलें आहे असें समजावें.

### जकात.

ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या गिरण्यांमध्यें तयार केलेल्या सुतावर जकात बसविण्याबाबद.

५. जलमार्गानें आयात केलेल्या सुतावर जकात घेण्यासाठीं सन १८९४ चा हिंदुस्थानचा तारिफाचा आक्ट ह्यांत त्या त्या वेळासाठीं जो दर ठरविलेला असेल, त्या दराप्रमाणें, ब्रिटिश हिंदुस्थानांतील प्रत्येक गिरणींत, त्या गिरणींत तयार केलेल्या सगळ्या कापसाच्या सुतावर, जकात बसवून वसूल करण्यांत येईल.

मात्र असें ठरविलें आहे कीं, ज्या सुतास व्यापारी रिवाजाप्रमाणें २० किंवा त्याहून कमी नंबराचें सूत ह्मणतात अशा कोणत्याही सुतावर जकात मुळींच घेतली जाणार नाहीं;

आणखीं असेंही ठरविलें आहे कीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, इंडिया गझेटांत जाहिरनामा देऊन, २४ पेक्षां जास्त नाहीं अशा कोणत्याही कौंटाच्या किंवा नंबराच्या कोणत्याही सुतावर जकातीची माफी देण्याचा अख्त्यार आहे.

खुलासा.—ह्या आक्टाच्या अर्थाप्रमाणें सूत खालीं लिहिलेल्या प्रसंगीं "तयार केलेलें" समजावें: ह्मणजे—

(अ) जें सूत ज्या गिरणींत कांतण्यांत आलें असेल त्याच गिरणींत तें गुंडाळलें जाऊन त्याचीं बंडलें बांधण्यांत आलीं असतील, त्या सुताच्या बाबतींत—त्याचीं ह्याप्रमाणें बंडलें बांधण्यांत आलीं ह्मणजे;

(ब) जें सूत ज्या गिरणींत कांतण्यांत आलें असेल तें सूत त्याच गिरणींत विणण्यांत आलें असेल अगर त्याचे इतर जिन्नस करण्यांत आले असतील त्या सुताच्या बाबतींत—तें सूत त्या गिरणीच्या कांतण्याच्या खात्यांतून बाहेर पाठविण्यांत आलें ह्मणजे;

(क) इतर कोणत्याही बाबतींत—तें त्या गिरणीच्या जागेंतून बाहेर पाठविण्यांत आलें ह्मणजे.

अशा सुताची तारिफ-किंमत ठरविण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस अधिकार.

६. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, इंडिया गझेटांत जाहिरनामा देऊन, वेळोवेळीं, सदरहू जकात घेण्याच्या कारणासाठीं, सदरीं सांगितलेल्या सर्व प्रकारच्या सुताच्या किंवा त्यांपैकीं कोणत्याही विवक्षित कौंटाच्या किंवा कौंटांच्या तारिफ-किंमती ठरविण्याचा व त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या तारिफ-किंमतींत फेरफार करण्याचा अधिकार आहे.

(२) पोट कलम (१) ह्याअन्वयें कोणताही जाहिरनामा प्रसिद्ध करण्यांत आलेला नसेल त्या प्रसंगीं, ह्या आक्टाच्या परिशिष्टांत दाखल केलेल्या किंमती सदरहू तारिफ-किंमती होत असें समजावें.

(३) सदरहू प्रकारची तारिफ-किंमत ज्या सुतास लागू असेल त्या सुताची ती किंमत ह्या आक्टाच्या कारणांसाठीं "खरी किंमत" होय असें समजावें; परंतु सदरील प्रसंग शिवायकरून इतर प्रसंगीं, सगळ्या सुताचा आकार ह्या आक्टाअन्वयें ठरविणें तो, मुख्य आक्टाच्या ३०व्या कलमांत व्याख्या केलेल्या खऱ्या किंमतीप्रमाणें ठरविला पाहिजे.

गिरणीच्या मालकांनीं, तयार केलेल्या सुताचें माही पत्रक देणें.

७. (१) प्रत्येक गिरणीच्या मालकानें, प्रत्येक महिन्याच्या पंधराव्या तारिखेस अगर त्याच्या पूर्वी, आपल्या गिरणींत मागील महिन्यामध्यें तयार झालेल्या जकात द्यावी लागणाऱ्या व न द्यावी लागणाऱ्या सगळ्या सुताचें एक पत्रक तयार करून किंवा करवून तें कलेक्टराकडे दिलें पाहिजे अगर देवविलें पाहिजे, आणि त्या पत्रकांतील मजकूर खरा असल्याबाबदचा इकरार त्या पत्रकाच्या शेवटीं करून त्याखालीं आपली सही केली पाहिजे.

(२) ह्या आक्टाखालील कानूमध्यें अन्यरीतीनें फर्माविण्यांत येतील ते प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, अशा प्रत्येक पत्रकांत, ५व्या कलमाच्या खुलाशांत सांगितलेल्या तीन वर्गांपैकीं दरेक वर्गाखालीं येणारें प्रत्येक कौंटाचें किंवा नंबराचें किती सूत गेल्या महिन्यांत तयार झालें तें, आणि जकात द्यावी लागणाऱ्या सुताच्या बाबतींत त्या सुताची खरी किंमत किती आहे तें, लिहिलेलें असलें पाहिजे.

(३) असें प्रत्येक पत्रक, ह्या आक्टाखालील कोणत्याही कानूअन्वयें ठरविण्यांत येईल त्या नमुन्याबरहुकुम असलें पाहिजे आणि त्यांत सदरीं निर्दिष्ट केलेल्या माहितीपेक्षां जी जास्त माहिती त्या कानूंत मागितलेली असेल ती दिलेली असली पाहिजे; आणि त्याचप्रमाणें, पत्रकाच्या खरेपणाची खात्री करण्याबाबद व इतर कांहीं बाबतींबाबद त्या कानूंत ठरविण्यांत येतील त्या अटींस तें पात्र राहील.

(४) असें पहिलें पत्रक, तारीख १९ माहे फेब्रुवारी सन १८९९ रोजीं अगर त्याच्या आधीं रुजू केलें पाहिजे, आणि त्यांत ह्या आक्ट अमलांत आल्याच्या तारिखेपासून तयार केलेल्या सगळ्या सुताचा समावेश केला पाहिजे.

जकात आकारण्याबाबद आणि ती भरण्याच्या नोटिशीबाबद.

८. (१) तदनंतर, तें पत्रक ज्या महिन्याबद्दल असेल, त्या महिन्यासाठीं कांहीं जकात घेण्याजोगी असली तर त्या कलेक्टरानें ती आकारिली पाहिजे, आणि तिची रकम तावडतोब भरण्यांत आली नाहीं तर, ह्या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूंत ठरविण्यांत येईल त्या नमुन्याबरहुकुम एक नोटीस मालकावर बजाविली

पाहिजे; त्या नोटिशींत, आकारलेली रकम नोटीस बजाविल्याच्या तारिखेपासून दाहा दिवसांच्या आंत भरली पाहिजे असें फर्माविलेलें असलें पाहिजे.

(२) पोट कलम (१) ह्याखालील नोटीस गिरणीच्या मालकावर बजवावयाची ती, तिची एक नकल त्या मालकास अथवा त्याच्या एजंटास त्याच्या नेहमींच्या काम करण्याच्या जागीं देऊन अथवा द्यावयास काढून, अगर असें करण्याची सोय नसेल तर, त्या नोटिशीची एक नकल त्या गिरणीच्या बाहेरील दरवाजांपैकीं एका दरवाजावर लावून, बजावण्याचा अधिकार आहे.

जलमार्गांचा कस्टम्सचा आक्ट ह्याचीं विवक्षित कलमें ह्या आक्टाअन्वयें जकात आकारण्याच्या व वसूल करण्याच्या कामीं लागू करण्याबाबद.

९. मुख्य आक्टांतलीं ३० ते ३४ हीं पांच कलमें, ३७ वें कलम, व ३९ ते ४१ हीं तीन कलमें, ह्या आक्टाअन्वयें बसविलेली जकात आकारण्याच्या व वसूल करण्याच्या कामीं लागू आहेत असें समजावें;

मात्र, असें ठरविलें आहे कीं, जें कोणतेंही सूत ह्या आक्टांत पुढें ठरविलेल्या रीतीनें वखारींत सांठवून ठेविलेलें नसेल, त्या सुतास, सदर्हू कलम ३७ ह्यांत ठरविल्याप्रमाणें पत्रक देतेवेळीं जो जकातीचा दर व जी तारिफ-किंमत अमलांत असेल तो दर व ती किंमत लागू न होतां, तें सूत तयार करण्यांत आलें त्यावेळीं अमलांत असलेला दर व किंमत हीं लागू होतील.

न भरलेली जकात वसूल करण्याबाबद.

१०. (१) ह्या आक्टाअन्वयें द्यावयाची कोणतीही जकात जर, ती भरण्यासाठीं सदर्हू प्रकारच्या कोणत्याही नोटिशींत ठरविलेल्या मुदतीच्या आंत भरली नाहीं, तर, तिच्या बदला, कलेक्टरास, त्याच्या नजरेस येईल त्याप्रमाणें, त्या न भरलेल्या रकमेच्या दुपटीहून जास्त नाहीं इतकी त्यास वाजवी वाटेल ती कोणतीही रकम, वसूल करण्याचा अधिकार आहे.

(२) पोटकलम (१) ह्याअन्वयें वसूल करावयाच्या सर्व रकमा, सन १८८६ चा आक्ट ९ रा, कलम ३०, पोट कलमें (१),(२) व (३), ह्यांत सांगितलेल्या रकमांच्या बाबतींत जी रीत त्या पोटकलमांत सांगितली आहे, त्या रीतीनें वसूल केल्या पाहिजेत.

**वखारींत माल भरून ठेवणें.**

सूत भरून ठेवण्यासाठीं वखारींस लैसेन्स देण्याबाबद आणि त्यांबद्दल फी घेण्याबाबद.

११. (१) कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यास, वेळोवेळीं, कोणत्याही खोलीला किंवा जागेला कापसाचा माल भरून ठेवण्याची वखार म्हणून लैसेन्स देण्याचा अधिकार आहे; आणि ह्या आक्टाच्या कारणांसाठीं, अशी दरेक जागा, मुख्य आक्टाअन्वयें वखार होय असें, आणि तिच्याबद्दल त्या आक्टाअन्वयें योग्यरीतीनें लैसेन्स दिलेला आहे असें, समजलें पाहिजे.

(२) मुख्य आक्टाअन्वयें लैसेन्स दिलेल्या खासगी वखारीच्यासंबंधानें त्या त्या वेळीं लैसेन्साबद्दल ज्या ज्या फी व त्यांसारख्या इतर रकमा द्याव्या लागत असतील त्या त्या फी व इतर रकमा सदर्हू प्रकारच्या प्रत्येक खासगी वखारीच्यासंबंधानें दिल्या पाहिजेत;

मात्र असें ठरविलें आहे कीं, कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यास, कोणत्याही विवक्षित वखारीसंबंधाच्या सदर्हू प्रकारच्या कोणत्याही फी अगर इतर रकमा पूर्णपणें अगर अंशतः माफ करण्याचा अधिकार आहे.

सूत वखारींत भरून ठेवण्याची परवानगी.

१२. (१) कोणत्याही गिरणीच्या मालकास, जें कोणतेंही सूत कलम ९ अन्वयें जकात दिली जाण्यास पात्र झालेलें असून त्या गिरणीच्या बाहेर पाठविण्यांत आलेलें नसेल, तें एकाद्या वखारींत भरून ठेवण्याच्या परवानगीसाठीं अर्जी करण्याचा अख्त्यार आहे.

(२) अशी अर्जी लेखी असून तिजवर अर्जदाराची सही असली पाहिजे, आणि ती कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यानें ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें असली पाहिजे.

१३. कलम १२ अन्वयें ज्या सुताच्या संबंधानें अर्जी करण्यांत आलेली असेल त्या सुताच्या जातीच्या आयात केलेल्या मालास मुख्य आक्टाच्या ११ व्या बाबीचे सर्व ठराव ज्या मानानें लागू असतील त्या मानानें ते सर्व ठराव त्या सुतास लागू होतील.

ह्या रीतीनें भरून ठेविलेल्या सुतास, जलमार्गाचा कस्टम्सचा आक्ट ह्याच्या ११ व्या बाबींतले ठराव लागू होण्याबाबद.

१४. जेव्हां कोणतेंही सूत वखारींत भरून ठेवण्यांत येईल तेव्हां, त्या सुताचें वजन व इतर तपशील हीं, तें सूत ज्या महिन्यांत तयार केलेलें असेल त्या महिन्याबद्दल ७ व्या कलमाअन्वयें पाठविण्याच्या पत्रकांत दाखल करून, तें सूत सदर्हूप्रमाणें वखारींत भरून ठेविलें ह्मणून निर्दिष्ट केलें पाहिजे; ह्मणजे जकात आकारून वसूल करितांना तें सूत वाद करण्यांत येईल.

ह्या रीतीनें भरून ठेविलेल्या सुतावर जकात न आकारण्याबाबद.

## तपासणी.

१५. (१) कलेक्टरास अगर स्थानिक सरकारानें ह्यासाठीं योग्यरीतीनें नेमिलेल्या कोणत्याही अमलदारास कोणत्याही गिरणींत, कामाच्या तासांत कोणत्याही वाजवी वेळीं, जाण्यायेण्याची मोकळीक असली पाहिजे.

गिरण्या तपासण्यास व कागदपत्रांच्या व हिशोबाच्या नकला घेण्यास कलेक्टरास अधिकार.

(२) कोणतेंहीं पत्रक खरें आहे किंवा नाहीं तें पहाण्यासाठीं अगर ह्या आक्टाच्या किंवा याखालील कोणत्याही कानूंच्या कारणांकरितां ज्या कोणत्याही बाबतींसंबंधानें माहिती पाहिजे असेल त्या त्या बाबतींविषयीं माहिती मिळविण्यासाठीं, सदर्हू प्रकारच्या कोणत्याही अमलदारास, कोणत्याही वेळीं, मालकास नोटीस देऊन किंवा दिल्यावांचून, गिरणींत चाललेल्या कामासंबंधाचे कागद आणि विकरीच्या व जमाखर्चाच्या वह्या तपासण्याचा आणि त्या सर्व किंवा कोणत्याही कागदांच्या अगर वह्यांच्या नकला अगर उतारे घेण्याचा अधिकार आहे.

१६. (१) सदर्हू प्रकारच्या सर्व नकला व उतारे व सदर्हू प्रकारच्या कोणत्याही अमलदारानें कोणतीही गिरणी किंवा वखार तपासून मिळविलेली इतर सर्व माहिती अगदीं न फोडायाची अशी समजून सरकारी गुप्त गोष्ट समजली पाहिजे.

मिळविलेली माहिती सन १८८९ चा १५ वा आक्ट ह्याच्या अर्थाअन्वयें सरकारी गुप्त गोष्ट समजावी.

(२) जो कोणताही सदर्हू प्रकारचा अमलदार आपल्या वरिष्ठ अमलदाराशिवाय इतर कोणत्याही मनुष्यास वर सांगितल्याप्रकारची कोणतीही सरकारी गुप्त गोष्ट कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्याची लेखी संमति आधीं मिळविल्याशिवाय कळवील, तो हुद्याच्या संबंधानें विश्वासघात केल्याबद्दल गुन्हेगार होऊन त्यावर त्या गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव झाला असतां तो सन १८८९ चा हिंदुस्थानचा सरकारी गुप्त गोष्टींबाबद आक्ट कलम ४, ह्यांत ठरविल्याप्रमाणें शिक्षेस पात्र होईल.

(३) सदरीं शेवटीं उल्लेख केलेल्या आक्टाच्या ९ व्या कलमांत ठेविलेला निर्बंध, हुद्याच्या संबंधानें विश्वासघात केल्याबद्दलच्या ह्या आक्टाअन्वयें चालवावयाच्या फौजदारी कामास लागू होणार नाहीं.

## बाहेर पाठविणें व ड्राव्याक.

१७. जर कोणतेंही जकातीस पात्र असलेलें सूत, त्याबद्दलचें पत्रक कलम ७ अन्वयें कलेक्टराकडे दिलें जाण्याच्या आधीं, जलमार्गानें कोणत्याही पारक्या बंदरीं पाठविण्यांत आलें तर, तें सूत ज्या गिरणींत तयार केलेलें असेल त्या गिरणीच्या मालकास, तें सूत ज्या बंदरीं तारवावर चढविलें असेल त्या बंदराच्या कलेक्टराकडे अर्जी करण्याचा अधिकार आहे; आणि तें सूत बाहेर पाठविण्यासाठीं खरोखर तारवावर चढविलें आहे अशी त्या कलेक्टराची खातरी झाली तर, त्यानें, त्या सुताचें वजन व इतर तपशील दाखल करून व तें सदर्हू प्रमाणें खरोखर तारवावर चढविण्यांत आलें आहे, असा शेरा लिहून, एक सर्टिफिकेट त्या मालकास दिलें पाहिजे.

जकातीस पात्र असलेलें सूत पारक्या बंदरास पाठविणें असेल तेव्हां सर्टिफिकेट देण्याबाबद.

सर्टिफिकेट दिलें ह्मणजे, सुतावर जकात माफ होईल.

१८. कलम १७ ह्याअन्वयें कोणतेंही सर्टिफिकेट देण्यांत आलें ह्मणजे, त्यांत सुताचें जें वजन व त्याचा जो इतर तपशील दाखल केलेला असेल त्या वजनाचें व तपशिलाचें सूत सदर्हूप्रमाणें तारवावर चढविण्यांत आलें आहे असें, तें सूत ज्या महिन्यांत तारवावर चढविण्यांत आलें असेल त्या महिन्यानंतरचा नाहीं अशा कोणत्याही महिन्याबद्दल ७ व्या कलमाअन्वयें पाठवावयाच्या पत्रकांत, लिहिलें पाहिजे; ह्मणजे, जकात आकारून वसूल करितांना तो माल बाद करण्यांत येईल.

पारक्या बंदरांस पाठविलेल्या सुताबद्दल दिलेली जकात परत देण्याबाबद.

१९. ज्या कोणत्याही सुताबद्दल ह्या आक्टाअन्वयें जकात देण्यांत आली असेल तें सूत कस्टम्सच्या कोणत्याही बंदराहून कोणत्याही पारक्या बंदरास जलमार्गानें पाठविण्यांत आलें तर, ती जकात, ह्यांत इतर रीतीनें ठरविण्यांत येईल तो प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं, ड्राब्याक ह्मणून परत देण्यांत येईल.

मात्र असें ठरविलें आहे कीं, अशा प्रत्येक बाबतींत, जकात देण्यांत आल्यानंतर त्या सुताचें विणून कापड केलेलें नसलें पाहिजे अगर इतर रीतीनें रूपांतर केलेलें नसलें पाहिजे, आणि त्या सुतावर जकात योग्य रीतीनें देण्यांत आल्याबद्दल, तें सूत ज्या बंदरीं तारवावर चढविलें असेल त्या बंदराच्या कलेक्टराची खातरी होईल अशा रीतीनें शाबिती केली पाहिजे, आणि तें, जकात दिल्याच्या तारिखेपासून दोन वर्षांच्या आंत किंवा कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्यास पुरतें कारण दाखविल्यावरून तो कोणत्याही प्रसंगीं जी कोणतीही जास्त मुदत ठरवील त्या मुदतीच्या आंत, बाहेर पाठविलेलें असलें पाहिजे.

**खुलासा.**—जें सूत धुण्यांत किंवा रंगविण्यांत येईल किंवा ज्या सुताचा शिवावयाचा दोरा करण्यांत येईल, त्याचें ह्या विशेष ठरावाच्या अर्थाअन्वयें रूपांतर केलें आहे असें समजूं नये.

पारक्या बंदरांस पाठविलेल्या विवक्षित कापसाच्या कापडाबद्दल दिलेली जकात परत देण्याबाबद.

२०. (१) जें कोणतेंही कापसाचें कापड ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही गिरणींत वनविलेलें असून ज्यांत जकातीस पात्र असलेल्या कौंटांचें सूत सर्वांशीं किंवा अंशतः असेल, तें कापड कस्टम्सच्या कोणत्याही बंदराहून कोणत्याही पारक्या बंदरास जलमार्गानें पाठविण्यांत येईल तेव्हां, अशा सुताबद्दल ह्या आक्टाअन्वयें जी कोणतीही जकात दिलेली असेल, ती जकात ड्राब्याक ह्मणून परत मिळण्यासाठीं, तें कापड ज्या बंदरीं तारवावर चढविलें असेल त्या बंदराच्या कस्टम्स कलेक्टराकडे अर्जी करण्याचा, तें कापड पाठविणाऱ्यास, अधिकार आहे.

(२) पोटकलम (१) ह्याअन्वयें करावयाच्या प्रत्येक अर्जींत अर्जदारानें,—

(अ) ज्या सुताच्या संबंधानें ड्राब्याकविषयीं दावा केलेला असेल, त्या सुताचें वजन व कौंट आणि तें ज्या गिरणींत तयार केलेलें असेल त्या गिरणीचें नांव आणि तें तयार केल्याच्या देतां येतील तेवढ्या जवळच्या तारखा, हीं लिहिलीं पाहिजेत;

(ब) तें कापड ज्या गिरणींत वनविलेलें असेल त्या गिरणीचें नांव आणि तें बनविल्याच्या देतां येतील तेवढ्या जवळच्या तारखा हीं लिहिलीं पाहिजेत.

अशी जकात केव्हां परत द्यावी त्याबाबद.

२१. कलेक्टरानें ड्राब्याक देणें ती,—

(१) सदर्हू कापड बाहेर पाठविण्यासाठीं ज्या तारखेस तारवावर चढविण्यांत आलें त्या तारिखेपूर्वीं बारा महिन्यांच्या आंत तें विणण्यांत आलें होतें अशी,

(२) ज्या सुताच्या संबंधानें ड्राब्याक मागण्यांत येत आहे त्या सुताबद्दल सदरील बारा महिन्यांच्या आंत जकात देण्यांत आली आहे अशी,

त्या कलेक्टरची खातरी करण्यांत आली तर, देण्यांत येईल.

२२. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, वेळोवेळीं, इंडिया गझेटांत जाहिरनामा देऊन, कोणत्याही विवक्षित पारक्या बंदरास पाठविलेल्या सुताबद्दल किंवा कापसाच्या कापडाबद्दल ड्राब्याक देण्याची मनाई करण्याचा अधिकार आहे.

विवक्षित बंदरांस पाठविलेल्या मालाच्याबाबतींत ड्यूटी परत देण्याची मनाई करण्याचा अधिकार.

२३. ह्या आक्टांत कोणतेही ठराव असले तरी, ज्या कोणत्याही सुतावर किंवा कापसाच्या कापडावर जकात दिलेली असेल, त्या सुताबद्दल किंवा कापडाबद्दल खालील प्रसंगीं ड्राब्याक देण्यांत येणार नाहीं; ह्मणजे—

विवक्षित बाबतींत जकात परत न देण्याबाबद.

(अ) त्या मालाची किंमत, दावा केलेले ड्राब्याकचे रकमेहून कमी असेल तेव्हां; अगर

(ब) तारवावर एकाच खेपेस चढविलेले मालाबाबद दावा केलेली ड्राब्याक पांच रुपयांहून कमी असेल तेव्हां.

२४. मुख्य आक्टाचीं ५१ व ५२ हीं कलमें, ह्या आक्टाअन्वयें ड्राब्याकसाठीं केलेल्या प्रत्येक दाव्यास लागू आहेत असें समजावें.

जलमार्गाचा कस्टम्सचा आक्ट ह्याचीं कलमें ५१ व ५२ हीं ह्या आक्टाखालील दाव्यांस लागू करण्याबाबद.

## अपराध व शिक्षा.

२५. खालीं लिहिलेल्या यादीचे पहिले आसनांत अपराध लिहिले आहेत त्यांबद्दल त्या अपराधांच्या संबंधानें त्याच यादीचे दुसरे आसनांत शिक्षा लिहिल्या आहेत तेथवर शिक्षा होतील:—

अपराधांबद्दल शिक्षा.

| | |
|---|---|
| १. ह्या आक्टाअन्वयें केलेली कोणतीही कानू तोडणें. | पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंड. |
| २. ह्या आक्टाअन्वयें जकातीस पात्र असलेल्या कोणत्याही सुतावरची जकात अगर तिचा कोणताही भाग देण्याचें चुकविण्याच्या इरादानें तें सूत छपवणें, छपवण्याचा प्रयत्न करणें, किंवा जाणून बुजून छपवूं देणें अगर दुसऱ्याकडून छपवणें. | सदहू प्रकारचें सूत जप्त करून सरकारदाखल केलें जाण्यास पात्र होईल, आणि हा अपराध ज्यावर शाबीत होईल तो मनुष्य, त्या सुताच्या किंमतीच्या तिपटीहून जास्त नाहीं इतकी रकम दंडादाखल देण्यास पात्र होईल. |
| ३. कलम ७ ह्याअन्वयें द्यावयाचें कोणतेंही पत्रक द्यावयास चुकणें किंवा तशा पत्रकावर सही करण्यास किंवा तें पुरें करण्यास नाकारणें. | पराकाष्ठा एक हजार रुपयेपर्यंत दंड. |
| ४. असें कोणतेंही पत्रक करणारास जी जी माहिती असेल व जें जें वाटत असेल त्या माहितीप्रमाणें व वाटण्याप्रमाणें खरा नाहीं असा मजकूर दाखल करून तें पत्रक तयार करणें व तें देणें. | हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्याच्या १९९ व्या कलमांत, इकरारांत खोटा मजकूर लिहिण्याबद्दल ठरविलेली शिक्षा. |
| ५. महसुलाचें कपटानें नुकसान करण्याच्या इरादानें, गिरणींत ठेवलेले कोणतेही कागदपत्र अगर जमाखर्चाच्या वह्या फिरवणें किंवा खोव्या करणें. | हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याबाबद कायदा ह्याच्या ४६५ व्या कलमांत बनाऊ लेख करण्याबद्दल ठरविलेली शिक्षा. |

| | |
|---|---|
| ६. ह्या आक्टाखालील कोणत्याही कानूंत ठेवण्यास सांगितलेले योग्य कागदपत्र व जमाखर्चाच्या वह्या न ठेवणें. | पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंड, आणि शाबितीच्या ठरावाच्या तारिखेनंतर जितके दिवस पर्यंत तो अपराध चालू ठेविला जाईल त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी वीस रुपये दंड. |
| ७. जें कोणतेंही पत्रक ह्या आक्टाखालील कोणत्याही कानूअन्वयें तयार करून देणें भाग आहे तें पत्रक तयार करण्यास व देण्यास चुकणें. | पराकाष्ठा एक हजार रुपयेपर्यंत दंड. |
| ८. ह्या आक्टाखालीं दिलेले कोणतेही अधिकार कोणताही कलेक्टर अगर इतर अमलदार चालवीत असतांना त्याला जाणून बुजून हरकत करणें. | पराकाष्ठा साहा महिनेपर्यंत कैद अगर पराकाष्ठा एक हजार रुपयेयर्यंत दंड अगर दोन्ही शिक्षा. |
| ९. ज्या सुताच्या संबंधानें कलम १७ अन्वयें सर्टिफिकेट मिळालेलें असेल, किंवा जो माल बाहेर पाठवावयाचा ह्मणून नोंदल्यावर त्याची ड्राव्याक दिलेली असेल, तें सूत अगर तो माल योग्य रीतीनें बाहेर पाठविला नसेल अथवा मुख्य आक्टांतील ठरावांअन्वयें योग्य रीतीनें जमिनीवर उतरल्याशिवाय अगर डिस्चार्ज झाल्याशिवाय कस्टम्सचे कोणतेही बंदरीं तारवावरून उतरला असेल किंवा पुनः जमिनीवर उतरला असेल तर. | सदहू प्रकारचा माल व तो सदहू प्रमाणें तारवांतून उतरण्यासाठीं किंवा पुनः जमिनीवर उतरण्यासाठीं उपयोग केलेलें कोणतेंही तारूं जप्त करून सरकारदाखल केलें जाण्यास पात्र होईल; आणि ज्या तारवांतून सदहू प्रकारचा माल सदहूप्रमाणें उतरला असेल अगर पुनः जमिनीवर उतरला असेल त्या तारवाचा मास्तर आणि ज्या कोणत्याही मनुष्यानें किंवा ज्याचे हुकुमावरून किंवा ज्याचेमुळें सदहू प्रकारचा माल सदहूप्रमाणें तारवावरून उतरला असेल किंवा पुनः जमिनीवर उतरला असेल, अगर जो सदहूप्रमाणें तारवावरून उतरण्यांत किंवा पुनः जमिनीवर उतरण्यांत मदत करील अगर सामील असेल, तो मनुष्य सदहूप्रकारचे मालाच्या किंमतीच्या पराकाष्ठा तिपटीपर्यंत किंवा पराकाष्ठा एक हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल. |
| १०. ड्राव्याकच्या जितक्या रकमेविषयीं दावा केला असेल, तितक्या रकमेहून कमी किंमतीचा कोणताही माल ड्राव्यांकसाठीं नोंदविला असला तर. | सदहूं प्रकारचा माल जप्त करून सरकारदाखल केला जाण्यास पात्र होईल. |
| ११. कोणतेंही सूत कोणत्याही गिरणींतील कोणत्याही जागीं, पेटींत किंवा बंद केलेल्या पात्रांत छपविलेलें सांपडेल, आणि त्याविषयीं कलेक्टरास खातरीलायक असा योग्य जाब देण्यांत येणार नाहीं तर. | सदहूप्रकारचें सूत जप्त करून सरकारदाखल केलें जाण्यास पात्र होईल. |

| | |
|---|---|
| १२. पत्रकांत दाखल केलेल्या सुताहून कोणतेंही जास्त सूत किंवा त्या पत्रकांतील तपशिलाशीं जुळत नाहीं असें सूत कोणत्याही गिरणीमध्यें सांपडेल तर. | सदहूप्रकारचें सूत जप्त करून सरकारदाखल केलें जाण्यास पात्र होईल किंवा कस्टम्सचा मुख्य अधिकारी फर्मावील तितकी जास्त जकात त्यावर घेतली जाईल. |
| १३. कोणताही कापसाचा माल मोजून किंवा प्याकेजाप्याकेजानें पसार केला असेल तेव्हां महसुलाची कोणतीही नुकसानी होण्यासारखें कोणतेंही वर्जन केलें किंवा खोटा तपशील सांगितला असें आढळेल तर. | सदहू प्रकारचें वर्जन केल्याचा किंवा खोटा तपशील सांगितल्याचा जो मनुष्य अपराधी असेल तो, फरक पडला तो आकस्मिक रीतीनें पडला असें कलेक्टराचे खातरीलायक रीतीनें शाबित करण्यांत आलें नाहीं तर, सदहू प्रकारच्या वर्जनानें किंवा खोटा तपशील सांगितल्यानें सरकारची जितकी जकात बुडाली असती, तितक्या जकातीचे पराकाष्ठा दसपटीपर्यंत दंडास पात्र होईल. |
| १४. जो कोणताही कलेक्टर अगर त्याच्या ताब्यांतला कोणताही इतर अमलदार ह्या आक्टाविरुद्ध किंवा ह्या आक्टाअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूविरुद्ध अगर हुकुमाविरुद्ध कोणतेंही कृत्य करील अगर कोणतीही कसूर करण्याचा अपराध करील, किंवा कोणत्याही मनुष्यास नुकसान करण्याचा किंवा त्रास देण्याच्या इरादानें, त्याला ह्या आक्टाअन्वयें दिलेल्या कोणत्याही अधिकाराचा त्रासदायक रीतीनें व विनाकारण उपयोग करील. | असा कलेक्टर किंवा अमलदार, त्यावर गुन्ह्याच्या शाबितीचा ठराव झाला असतां पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंतच्या दंडास पात्र होईल. |
| १५. जकातीस पात्र असलेला माल वखारींत भरून ठेवण्यासंबंधानें मुख्य आक्टाचें कलम १६७, परिशिष्टाचे नंबर ४१–५३ (दोन्ही धरून) ह्यांत सांगितलेले अपराध. | त्याच परिशिष्टांत त्या त्या अपराधास सांगितलेल्या शिक्षा. |

२६. कोणत्याही जिल्हा माजिस्ट्रेटास किंवा प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटास किंवा पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटास ह्या आक्टाविरुद्ध करण्यांत आलेल्या गुन्ह्यांचा संक्षिप्त रीतीनें इन्साफ करण्याचा अधिकार आहे.

कोणत्या माजिस्ट्रेटांस हुकुमत आहे तें.

२७. मुख्य आक्टाचें कलम १६८ हें, ह्या आक्टाअन्वयें ज्या ज्या बाबतींत माल जप्त करून सरकारदाखल करण्यांत येईल त्या त्या बाबतीस लागू आहे असें समजावें.

जलमार्गांचा कस्टम्सचा आक्ट ह्याचें कलम १६८वें ह्या आक्टाअन्वयें जप्त करून सरकारदाखल केल्याच्या प्रकरणांस लागू करणें.

२८. मुख्य आक्टांतील कलमें १६९, १७०, १७७, १८२, १८४, १८५, १८७ १९०, १९१ व १९३ हीं शिवाय करून त्या आक्टाच्या १७ व्या बाबींतले सर्व ठराव ह्या आक्टाअन्वयें चालविलेल्या कामास लागू होतील.

त्याच आक्टाचे विवक्षित ठराव ह्या आक्टाअन्वयें चालविलेल्या कामास लागू करणें.

ह्या आक्टाखालील हुकूम रद्द करण्यास किंवा त्यांत फेरफार करण्यास स्थानिक सरकारास अधिकार.

२९. ह्या आक्टाअन्वयें दिलेल्या कोणत्याही निकालावरून किंवा केलेल्या कोणत्याही हुकुमावरून नुकसान झालेल्या कोणत्याही मनुष्यानें अर्जी केली असतां स्थानिक सरकारास तो निकाल अगर हुकुम रद्द करण्याचा किंवा त्यांत फेरफार करण्याचा अधिकार आहे.

## किरकोळ.

नमुने घेण्याचा अधिकार.

३०. (१) कोणतेंही सूत अगर कापड तपासण्यासाठीं, अगर त्याचा कौंट किंवा किंमत नक्की ठरविण्यासाठीं अगर इतर कोणत्याहि जरूरीच्या कारणासाठीं, कलेक्टरास अगर कलम १९ अन्वयें नेमिलेल्या कोणत्याही अमलदारास त्या सुताचे अगर कापडाचे नमुने कोणत्याही वेळीं घेण्याचा अधिकार आहे.

(२) सदर्हू प्रकारचा दरेक नमुना, साधल्यास, त्याच्या मालकास परत दिला पाहिजे अगर त्या मालकाची तशी मर्जी असल्यास कलेक्टरानें तो विकून त्याचें जें उत्पन्न येईल त्याचा त्या मालकास हिशोब दिला पाहिजे.

गिरण्यांच्या मालकांनीं कागदपत्र व हिशोब ठेविले पाहिजेत.

३१. प्रत्येक गिरणीच्या मालकानें, ह्या आक्टाखालील कोणत्याही कानूमध्यें ठरविण्यांत येतील ते सर्व कागदपत्र व जमाखर्चाच्या वह्या ठविल्या पाहिजेत.

जलमार्गाचा कस्टम्सचा आक्ट ह्याच्या १९८ व्या कलमांतील ठराव ह्या आक्टाअन्वयें चालू केलेल्या कामास लागू करणें.

३२. मुख्य आक्टाच्या १९८ व्या कलमाचे ठराव, ह्या आक्टाअन्वयें केलेली अशी दिसणारी जी कोणतीही गोष्ट तिच्या बाबतींत चालविलेल्या कामास लागू होतील असें समजावें.

कानू करण्याचा अधिकार.

३३. (१) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस खालील कारणांसाठीं ह्या आक्टाअन्वयें कानू करण्याचा अधिकार आहे; ह्मणजे—

(अ) ह्या आक्टावरून अगर ह्या आक्टाअन्वयें द्यावयाच्या कोणत्याही पत्रकाचा नमुना, आणि त्या प्रत्येकांत दाखल करावयाचा तपशील, आणि त्याचा खरेपणा पाहण्याची रीत, आणि त्याच्या संबंधानें ज्या कोणत्याही इतर अटी जरूर असतील त्या सर्व अटी, हीं ठरविण्यासाठीं;

(ब) कलेक्टरानें कलम ८ अन्वयें द्यावयाच्या नोटिशीचा नमुना ठरविण्यासाठीं;

(क) गिरण्यांची तपासणी, आणि तिच्या संबंधाचे कलेक्टराचे व इतर अमलदारांचे अधिकार व कामें, ह्यांचें नियमन करण्यासाठीं;

(ड) ह्या आक्टाअन्वयें वखारी ठेवणें आणि त्या वखारींत सूत भरून ठेवणें व त्यांतून तें सूत बाहेर काढणें, आणि त्या संबंधाचे कलेक्टराचे अधिकार व कामें, ह्यांचें नियमन करण्यासाठीं;

(इ) ह्या आक्टाअन्वयें गिरण्यांच्या मालकांनीं कोणते कागदपत्र व जमाखर्चाच्या वह्या ठेवावयाच्या तें ठरविण्यासाठीं;

(फ) कोणता बंदोबस्त केल्यानें कलम २१ ह्यांतले हुकुम योग्य रीतीनें अनुसरण्यांत आले आहेत असें समजलें जाईल, तो बंदोबस्त ठरविण्यासाठीं;

(ग) साधारणतः, ह्या आक्टांतील ठराव अमलांत आणण्याच्या कारणांसाठीं.

(२) सदर्हू प्रकारच्या कोणत्याही कानूंत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही जागेस किंवा जागांस मात्र ती कानू लागू करण्याचा अधिकार आहे.

जलमार्गाच्या कस्टम्सच्या आक्टांतील विवक्षित ठराव ह्या भागांत दाखल करण्याबाबद.

३४. मुख्य आक्टाच्या २०१ ल्या, २०४ थ्या, २०९ व्या व २०६ व्या कलमांतील ठराव ह्या भागांत दाखल केले आहेत असें समजावें.

३५. सन १८९४ चा हिंदुस्थानचा तारिफाचा आक्ट ह्याच्या १०व्या कलमांतले ठराव ह्या आक्टाअन्वयें कापसाच्या मालावर बसविलेल्या जकातीस लागू होतील.

तारिफाबाबद आक्टाचें १० वें कलम ह्या आक्टाखालील जकातीस लागू करण्याबाबद.

## भाग २.

### देशांतील कस्टम्सची जकात.

३६. (१) ह्यानंतर ह्या कलमांत दिलेल्या अधिकाराअन्वयें जो कोणताही मुलुख पारका मुलुख आहे असें ठरविण्यांत येईल, त्या मुलुकांतून ब्रिटिश हिंदुस्थानांत येणाऱ्या कापसाच्या सुतावर व कापसाच्या बनविलेल्या सर्व जातीच्या जिन्सांवर, सन १८९४च्या हिंदुस्थानच्या तारिफाच्या आक्टांत त्या त्या वेळीं ठरविलेल्या दरांनीं कस्टम्सची जकात घेण्यांत येईल.

पारक्या मुलुकांतून ब्रिटिश हिंदुस्थानांत येणारें सूत व कापसाचे बनविलेले जिन्नस यांवर जकात घेण्याबाबद.

(२) ब्रिटिश हिंदुस्थानच्या आंत किंवा त्याच्या सरहद्दीवर असलेला परंतु ब्रिटिश हिंदुस्थानाचा भाग नसलेला कोणताही मुलुख ह्या कलमाच्या कारणांसाठीं पारका मुलुख आहे असें इंडिया गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून ठरविण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस अधिकार आहे.

(३) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस, वेळोवेळीं, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, अशा कोणत्याही पारक्या मुलुकांतून ब्रिटिश हिंदुस्थानांत कापसाचें सूत अथवा कापसाचे बनविलेले जिन्नस आणण्याची मनाई करण्याचा अगर आणण्याच्या कामावर निर्बंध ठेवण्याचा अगर फक्त ज्या रस्त्यानें ते आणितां येतील, ते रस्ते ठरविण्याचा अधिकार आहे.

(४) अशा कोणत्याही जाहीरनाम्याच्या विरुद्ध ब्रिटिश हिंदुस्थानांत आणिलेल्या किंवा आणण्याचा प्रयत्न केलेल्या सर्व मालास मुख्य आक्टाच्या १९ अ ह्या कलमांतील ठराव लागू होतील.

३७. बाहेर पाठविलेल्या मालाच्यासंबंधानें मिळणाऱ्या ड्राब्याकसंबंधीं मुख्य आक्टाचे ठराव, ज्या कोणत्याही मालावर ह्या भागाअन्वयें जकात दिलेली असेल, त्या सगळ्या मालास लागू होतील.

जलमार्गाच्या कस्टमच्या आक्टाचे ड्राब्याक संबंधाचे ठराव, ह्या भागाअन्वयें कर आकारलेल्या मालास लागू करण्याबाबद.

# परिशिष्ट.

(कलम ६ पहा).

### सुताची (दर रतलास) तारीफ-किंमत.

| सुताचा प्रकार. | तारीफ-किंमत. | | | सुताचा प्रकार. | तारीफ-किंमत. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै. | म्यूल व वाटर— | रु. | आ. | पै. |
| मेडिओ, नंबर ४० चें ... ... | ० | ९ | ६ | नंबर २० च्या वर तें नंबर २४ पर्यंत ... | ० | ९ | ६ |
| ,, ,, ५० चें ... .. | ० | ११ | ० | ,, २४ ,, ३२ ,, ... | ० | ७ | ० |
| ,, ,, ६० चें ... ... | ० | १२ | ६ | ,, ३२ ,, ४२ ,, ... | ० | ८ | ० |
| आणि ह्याप्रमाणें, नंबर ६० च्या वरील प्रत्येक दाहांच्या कौंटाबद्दल किंवा दाहांच्या कौंटांच्या कोणत्याही भागाबद्दल सदर्हू किंमतींत दीड आणा जास्त वाढवावा. | | | | ,, ४२ ,, ५२ ,, ... | ० | ९ | ६ |
| | | | | ,, ५२ ,, ६० ,, ... | ० | ११ | ६ |
| | | | | ,, ६० ,, ७० ,, ... | ० | १३ | ६ |
| | | | | ,, ७० ,, ८० ,, ... | ० | १५ | ० |

## परिशिष्ट.—( पुढें चालू ).

| सुताचा प्रकार. | तारिफ-किंमत. | | |
|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै. |
| आणि ह्याप्रमाणें, नंबर ८० च्या वरील प्रत्येक दाहांच्या कौंटांबद्दल किंवा दाहांच्या कौंटांच्या कोणत्याही भागाबद्दल सदर्हू किमतींत एक आणा जास्त वाढवावा. | | | |
| **म्यूल दुहेरी—** | | | |
| नंबर २० च्या वर तें नंबर २४ पर्यंत ... | ० | ६ | ६ |
| „ २४ „ ३२ „ ... | ० | ८ | ० |
| „ ३२ „ ४२ „ ... | ० | ९ | ० |
| „ ४२ „ ९२ „ ... | ० | १० | ६ |

| सुताचा प्रकार. | तारिफ-किंमत. | | |
|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै. |
| नंबर ९२ च्या वर तें नंबर ६० पर्यंत ... | ० | १२ | ६ |
| „ ६० „ ७० „ ... | ० | १४ | ६ |
| „ ७० „ ८० „ ... | १ | ० | ० |
| आणि ह्याप्रमाणें, नंबर ८० च्या वरील प्रत्येक दाहांच्या कौंटांबद्दल किंवा दाहांच्या कौंटांच्या कोणत्याही भागाबद्दल सदर्हू किमतींत एक आणा जास्त वाढवावा. | | | |
| पांढरें किंवा धुतलेलें दुहेरी, सर्व नंबराचें. | ० | १२ | ० |

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
आफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.